# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Missing Property**

**Police Station** :- **Mangrulpir**

**Date of Good Work done** :- **31/01/2022**

**Brief of the work done :-**

पोलिस स्टेशन मंगरूळपीर येथील ठाणेदार श्री जगदाळे व त्यांच्या पथकाने येथील आठवडी बाजारात हरवलेला मोबाईल चा अवघ्या काही तासात शोध घेऊन फिर्यादीस परत दिला.



**मंगरुळपीर : हरविलेला मोबाईल महिलेच्या स्वाधीन करताना पोलिस.**

## हरविलेल्या मोबाईलचा दहा मिनिटांत छडा

**मंगरुळपीर, ता. ३०** : येथील आठवडी बाजारातून ता. २९ रोजी एका महिलेचा मोबाईल हरविला असता पोलिसांनी दहा मिनिटांत मोबाईल शोधून महिलेला परत दिला.

ता. २९ रोजी येथील आठवडी बाजारातून तालुक्यातील चिखलागड येथील लक्ष्मी राठोड या महिलेचा मोबाईल हरवला होता. त्याची तक्रार देण्यासाठी सदर महिला पोलिस ठाण्यात आली असता मोबाईल हरवला असून त्यावर कॉल लागत असल्याचे महिलेने एपीआय तुषार जाधव यांना सांगितले. यावर जाधव यांनी वाशीम येथे सायबर सेलचे दीपक घुगे यांना सदर बाब सांगितली व मोबाईलचे लोकेशनबाबत माहिती मागितली.

लोकेशन मिळाल्यावर लगेच ठाणेदार जगदाळे यांना सांगून एपीआय तुषार जाधव, पो.कॉ. अमोल वानखडे, अमोल वारकड, नागोराव राठोड संबधित ठिकाणी पोचले. मोबाईल ताब्यात घेऊन तसेच खात्री करून फिर्यादी महिलेस मोबाईल परत देण्यात आला. या कामगिरीचे एसडीपीओ केडगे, ठाणेदार जगदाळे यांनी कौतुक केले.